# बृहन्मुंबई महानगरपालिका
## रा.ए.स्मा. रुग्णालय, परळ, मुंबई-४०० ०१२
क्र. केईएम/पी/ 731/ओडी दि.04.03.2020

## सुधारीत जाहिरात

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या प्रमुख रुग्णालयामध्ये खालील अटी व शर्ती पूर्ण करणा-या उमेदवारांकडून व बृहन्मुंबई महानगरपालिका रुग्णालय व वैद्यकीय महाविद्यालय तसेच शासकीय रुग्णालय व वैद्यकीय महाविद्यालयातून सेवानिवृत्त झालेले अधिष्ठाता, वैद्यकीय अधिक्षक व उपअधिष्ठाता यांच्याकडून दि. 06.03.2020 ते 31.03.2020 या कालावधी मध्ये एक वर्षाकरीता (एका वेळी किमान १७९ दिवसाकरीता एका दिवसाचा खंड देवून) कंत्राटी तत्त्वावर प्रमुख कार्यकारी अधिकारी (सी.ई.ओ.) पदाकरीता अर्ज मागविण्यात येत आहेत.

| | | |
|---|---|---|
| **१** | **पदनाम** | **प्रमुख कार्यकारी अधिकारी (सी.ई.ओ.)** |
| २ | एकूण पदे | ५ |
| ३ | शैक्षणिक अर्हता | 1. उमेदवार कोणत्याही शाखेचा पदवीधर असावा.<br>2. उमेदवार मान्यताप्राप्त विद्यापीठामधुन तसेच इंडियन इन्स्टिट्युट ऑफ टेक्नॉलॉजी (IIT's), ऑल इंडिया इन्स्टिट्युट ऑफ मेडिकल सायन्स (AIIMS), पोस्ट ग्रॅज्युएट इन्स्टिट्युट मेडिकल सायन्स (PGIMS) चंदीगड, टाटा इन्स्टिट्युट ऑफ सोशल सायन्स (TISS) यांसारख्या विद्यापीठामधून खालील नमुद कोणतीही एक पदव्युत्तर पदवी उत्तीर्ण झालेला असावा.<br>a) एम.बी.ए. (हेल्थ केअर मॅनेजमेंट)<br>b) एम.बी.ए. (हेल्थ अडमिनिस्ट्रेशन)<br>c) मास्टर ऑफ हेल्थ अडमिनिस्ट्रेशन (MHA)<br>d) एम.फिल. (हॉस्पिटल अडमिनिस्ट्रेशन)<br>e) मास्टर ऑफ सायन्स इन हेल्थ अडमिनिस्ट्रेशन (MSHA)<br>f) मास्टर ऑफ पब्लिक हेल्थ (हेल्थ अडमिनिस्ट्रेशन) (MPH)<br>g) डिप्लोमा इन हेल्थ अडमिनिस्ट्रेशन (DHA)<br>(बृहन्मुंबई महानगरपालिका रुग्णालय व वैद्यकीय महाविद्यालय तसेच शासकीय रुग्णालय व वैद्यकीय महाविद्यालयातून सेवानिवृत्त झालेले अधिष्ठाता, वैद्यकीय अधिक्षक व उपअधिष्ठाता यांचेसाठी ही अट शिथिल करण्याचे अधिकार निवड समितीस असतील.) |
| ४ | अनुभव | 1. किमान 250 खाटा असणा-या रुग्णालयातील प्रशासकीय कामकाजाचा किमान पाच ते दहा वर्षाचा अनुभव असावा.<br>2. उमेदवार माध्यमिक शालांन्त प्रमाणपत्र परीक्षा किंवा तत्सम किंवा उच्चतम परीक्षेत किमान १०० गुणांची मराठी प्रश्नपत्रिका असलेला |

| | | |
|---|---|---|
| | | मराठी विषय घेऊन उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.<br>3. संगणकाचे तसेच इंटरनेटचे अद्ययावत ज्ञान असणे आवश्यक राहील.<br>4. वैद्यकीय (रुग्णालयीन कामाकाजासंदर्भातील) क्षेत्रातील नियम व कायदे यांचे सखोल ज्ञान असणे आवश्यक आहे.<br>5. उत्तम लेखन व संवाद कौशल्य असणे आवश्यक. |
| ५ | वयोमर्यादा | दि.01.04.2020 रोजी उमेदवाराचे वय ३८ वर्षापर्यंत असावे<br>(बृहन्मुंबई महानगरपालिका रुग्णालय व वैद्यकीय महाविद्यालय तसेच शासकीय रुग्णालय व वैद्यकीय महाविद्यालयातून सेवानिवृत्त झालेले अधिष्ठाता, वैद्यकीय अधिक्षक व उपअधिष्ठाता यांना ही अट लागू नाही.) |
| ६ | करार कालावधी | एक वर्ष (एका वेळी किमान १७९ दिवसाकरीता एका दिवसाचा खंड देवून) |
| ७ | शारीरिक/मानसिक स्थिती | उत्तम असावी. |
| ८ | ठोक वेतन | रु. 1,50,000/- द.म. (कोणतेही भत्ते अनुज्ञेय नाहीत.) |
| ९ | कामाचे स्वरुप | प्रमुख रुग्णालयाच्या ज्या रुग्णालयात नियुक्ती दिलेली असेल त्या रुग्णालयाच्या खाते प्रमुखांनी दिलेली सर्व कामे पार पाडणे आवश्यक राहील. |
| १० | अर्ज करण्याचा दिनांक | **दि. 06.03.2020 ते 31.03.2020** |
| ११ | अर्जाचे शुल्क | **(रु. 1050/-जी.एस.टी.सह)** अर्जाचे शुल्क प्रस्ताव विभाग, रा.ए.स्मा. रुग्णालय, परळ येथुन चलन दि.06.03.2020 ते 31.03.2020 पर्यंत कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी १०.३० ते संध्याकाळी ४.३० प्राप्त करुन म.न.पा. तिजोरीत भरल्यानंतर अर्जाची नमुना प्रत देण्यात येईल. अर्जाचे शुल्क भरल्याबाबतची पावती सोबत जोडणे आवश्यक राहील. |
| १२ | अर्ज करण्याची पध्दत | नमुना अर्जाची प्रत प्रस्ताव विभाग, रा.ए.स्मा. रुग्णालय, परळ, मुंबई-४०००१२ येथे दि. 06.03.2020 ते 31.03.2020 पर्यंत कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी १०.३० ते संध्याकाळी ४.३० पर्यंत उपलब्ध होईल. पूर्ण भरलेला अर्ज प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रतीसह आवक जावक विभाग, रा.ए.स्मा. रुग्णालय, तळ मजला, महाविद्यालय इमारत, परळ, मुंबई-४०० ०१२ येथे दि. 06.03.2020 ते 31.03.2020 पर्यंत कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी १०.३० ते संध्याकाळी ४.३० पर्यंत स्वीकारण्यात येईल. |
| १३ | निवडीची कार्यपध्दती | 1. मुलाखत<br>2. वैद्यकीय तपासणी<br>3. पोलिस चौकशी<br>4. कंत्राट करार |

| | | |
|---|---|---|
| १४ | सामान्य अटी आणि शर्ती | 1. अर्जाची पडताळणी करताना चुकीची माहिती भरलेली आढळल्यास सदर अर्ज कोणतीही सुचना न देता रद्द करण्यात येईल.<br>2. सदर नियुक्त्या एक वर्ष (एका वेळी किमान १७९ दिवसाकरीता एका दिवसाचा खंड देवून) कंत्राट कालावधीकरिता असल्याने, त्यांना सदर महानगरपालिकेमध्ये कोणत्याही पदावर कोणत्याही प्रकारचा हक्क सांगता येणार नाही.<br>3. करार कालावधीतील सेवा ही निवृत्ती वेतन, बोनस, रजा प्रवास सवलत, रजा रोखीकरण किंवा अन्य कोणत्याही आर्थिक लाभासाठी व सेवाविषयक लाभांसाठी विचारात घेतली जाणार नाही.<br>4. कराराच्या एक वर्ष (एका वेळी किमान १७९ दिवसाकरीता एका दिवसाचा खंड देवून) कालावधीत सीईओ यांना एकूण एक वर्षात १० दिवसाची किरकोळ रजा अनुज्ञेय आहे. अन्य कोणत्याही रजा त्यांनी उपभोगल्यास त्यानुसार वेतन कपात करण्यात येईल.<br>5. करार कालावधीत कामगिरी असमाधानकारक किंवा गैरशिस्त असल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता त्यांचा नियुक्तीचा करार समाप्त करण्यात येईल.<br>6. वरील अटी/शर्ती मध्ये बदल/वाढ करण्यात आल्यास त्या सर्व सीईओंना बंधनकारक असतील. |

**टीप- दि. 16.12.2019 रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहिरातीच्या अनुषंगाने अर्ज सादर केलेल्या अर्जदारांनी पुन्हा अर्ज करण्याची आवश्यकता नाही.**

,

सही/-

अधिष्ठाता

रा.ए.स्मारक रुग्णालय